Historicity Research Journal
Volume 1 | Issue 3 | Nov 2014

ISSN:- 2393-8900

Research Article

नंदूरबार जिल्ह्यातील ख्रिश्चन मिशनरींचे कार्यः एक ऐतिहासिक अभ्यास

विजय पुंडलिक साळुंखे

सारांश :-

महाराष्ट्राच्या अगदी उत्तरेला असलेला 'नंदूरबार' हा जिल्हा, आदिवासींची वस्ती असलेला भुप्रदेश म्हणून ओळखला जातो. नंदूरबार हा जिल्हा 'खानदेश' ची उत्तर सिमा निर्धारीत करतो. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्यामते, "खानदेशचे मूळ नाव 'कन्हदेश' असे होते. देवगीरीच्या यादवकुळातील राजा कृष्ण अथवा कन्ह याने या प्रांताला कन्हदेश असे नाव दिले."[1] नंतरच्या काळात या अपभ्रश होवून खानदेश हें नामाभिधान रुढ झालेले दिसून येते. इ. स. 1906 मध्ये खानदेशचे विभाजन होवून पूर्व खानदेश आणि पष्चिम खानदेश असे दोन विभाग करण्यात आले. पश्चिम खानदेशात असलेला सातपूडा पर्वतरांगामधील भाग हा नंदूरबार परगण्याचा प्रदेश होता. इ. स. 1998 मध्ये स्वतंत्र असा नंदूरबार जिल्हा निर्माण करण्यात आला. विशयाची व्याप्ती निर्धारीत व्हावी म्हणून व प्रतिसादक म्हणून नंदूरबार जिल्ह्याची निवड केली आहे. इ. स. 1818 मध्ये पेशवाईचा अस्त होवून इंग्रजी ईष्ट इंडीया कंपनीचा अम्मल मुंबई इलाख्यात सुरु झाला. असे असले तरी कंपनी आणि तिचे व्यवस्थापक भारतात धर्मप्रचार करण्याच्या विरुध्द होते. कारण कंपनीच्या संचालकांना असे वाटत होते की, भारतात जर आपण धर्मप्रचार केला तर लोकांमध्ये जागृती निर्माण होईल व नुकत्याच स्थिरस्थावर झालेल्या कंपनीच्या व्यापारी हितसंबंधांना, त्यामूळे धोका निर्माण होईल म्हणून प्रारंभिक काळात कंपनीने मिशनरींना धर्मप्रचार करण्याची परवानगी दिली नाही. असे असले तरी "इ. स. 1813 च्या सनदेच्या नुतनीकरणाच्या वेळी मिशनरींना कायद्याने भारतात धर्मप्रचार करण्याची परवानगी देण्यात आली."[2] ही परवानगी मिळाल्यामुळे मिशनरी भारतात येण्यास प्रारंभ झाला.

प्रस्तावना :-

ख्रिस्ती मिशनरींनी नंदूरबार या भागात सेवाकार्य आणि प्रचार व प्रसाकार्य केलेले दिसून येते. मिशनरींनी या भागाची निवड का़ केली? कारण या भागात आदिवासींची वस्ती होती. मावची, पाडवी, वळवी, वसावा, गावीत, पावरा आणि कोकणा आदिवासींचे वास्तव्य या प्रदेषात दिसून येते. व शिवाय ब्रिटीश सरकारच्या काळात सरकारने नेमलेला "भिल्लांचा राजकीय प्रतिनिधी कर्नल लेस्ली याने या भागात धर्मप्रचार करण्यास पुरक वातावरण असल्याचा निर्वाळा दिला"[3] त्याचबरोबर लेस्लीने केनेडीयन अन्ड प्रेसबटेरीयन मिशनचे प्रमुख आणि काही मिशनरींना नंदूरबारच्या सातपूडा लगतच्या भागात येवून प्रचारकार्य करण्यासाठी उत्तेजन दिले. कर्नल लेस्लीच्या प्रयत्नामूळे " केनेडीयन ॲन्ड प्रेसबटेरीयन मिषनने आमखुट आजचे (तोरणमाळ) येथून सेवाभावी कार्याला प्रारंभ केला"[4] या मिशनने भिल्ल आदिवासींमध्ये रहाणे, शिकारीचा उद्योग करणे व भिल्लांना आपल्याकडे आकर्षित करणे इ. उद्योग सुरु केले. मात्र या उद्योगांद्वारे आपणास यश मिळणार नाही याची खात्री मिशनरींना होती. तरीही निराश न होता मिशनरींनी प्रयत्न सुरु ठेवले.

'इ. स. 1897 मध्ये मुंबई इलाख्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली'[5]. या दुष्काळाने नंदुरबार भागाला प्रभावित केले. शेती ओस पडली, पिके वाळू लागली, दुष्काळी परिस्थिती निवारण्यासाठी मिशनरींनी प्रयत्न केले. मात्र मिशनरींचे दुष्काळ निवारण्यासाठी केलेले प्रयत्न अपूर्ण होते. कारण त्याकरीता त्यांना पैशाची अवश्यकता होती. एवढया मोठया प्रमाणात दुष्काळग्रतांना पैसे, धान्य, पुरविणे मिशनरींना शक्य नव्हते. थोडक्यात पैशाच्या कमतरतेमूळे मिशनरींचे दुष्काळ निवारण्यासाठी केलेले प्रयत्न कमी पडले. दुष्काळाचा प्रभाव सतत दोन– तिन वर्श राहीला. दुष्काळग्रतांना मदत

करण्यासाठी "इ. स. 1903 मध्ये डंकर ब्रदरन आणि प्रेसबटेरीन चर्च आफ आर्यलॅंड"[6] या मिशनरींनी भिल्लांकरीता कार्य सुरु केले. मात्र भिल्ल आदिवासींकडून योग्य प्रतिसाद न मिळाल्यामूळे मिशनरींचे हे कार्य थंडावलेले दिसते. मिशनरीनी सुरु केलेल्या या प्रारंभिक कार्यात जाणिवपूर्वकता होती मात्र जोश दिसून येत नाही. शिवाय मिशनरीना यापूर्वी खासी, गारो, आणि छोटा नागपूरच्या भागात दुष्काळ आणि साथीच्या आजारांच्या काळात यश आले होते. नंदूरबार मध्ये मात्र मिशनरींची ही धारणा फोल ठरली. असे असले तरी, 'मिशनरींनी 45 लोकांचे धर्मांतर करुन त्यांना बाप्तिष्मा दिला.'[7] मिशनरींना या ठिकाणी जे यश मिळाले त्यामूळे मिशनरींना या भागात कार्य करण्याची प्रेरणा मिळाली.

मिशनरींनी भिल्ल आदिवासींमध्ये धर्मप्रचार करता यावा म्हणून प्रथमतः स्थानिक 'भिलोरी' भाशा आत्मसात करण्याचा प्रयत्न केला. कारण आपले संभाषण जर आदिवासींना समजले नाही तर आपले इस्पीत साध्य होणार नाही याची पूर्ण जाणीव मिशनरींना होती आणि या जाणीवेचा परिणाम म्हणून त्यांनी भिलोरी भाषा शिकण्याचा व बोलण्याचा प्रयत्न केला. इ. स. 1905 च्या सुमारला टिबेटच्या भागात कार्य करणाऱ्या मिशनरींना असे निर्देष मिळाले की, आपण खानदेशातील आदिवासींमध्ये प्रचारकार्य करावे. टिबेटमधील भौगोलिक वातारणामूळे मिशनरीना तेथे रहाणे शक्य होत नव्हते; म्हणून मिशनरीनी खानदेशातील नंदूरबार या आदिवासी भागाकडे आपला मोर्चा वळविला. आणि 'टिम'(The Evengelical Allance Mission) मिशनचे दोन मिशनरी 'ए. पी. फॅकलिन व ए. जे. सेलिन हे नंदूरबार भागात धर्मप्रचार करण्यासाठी आले'.8 नंदूरबार भागात प्रचारकार्यासाठी आल्यानंतर त्यांनी या भागात दौरा काढन दुर्गम पहाडी भागाची पहाणी केली. कारण त्यांना या ठिकाणी मिशन केंद्र स्थापन करावयाचे होते. नंदूरबार शहराच्या उत्तरेला एका टेकडीवर मिशनरींनी जागेची निवड केंली व तेथे मुंदलवड नावाचे गाव वसविल्याचे मौखीक पूरावे मिळतात. मुंदलवड येथे वसाहत स्थापन करुन मिशनरींनी सेवाकार्याला प्रारंभ केला. त्यांनी येथे लोकांना मोफत औषधी वाटल्या, आजारी जणांची सेवा केली, शिक्षणाचे महत्व लोकांना सांगीतले व शुभवर्तमानाचा प्रचार केला. शुभवर्तमानच्या प्रसारासाठी त्यांनी शिक्षण हे उपयुक्त माध्यम मानले. कारण शिक्षणाद्वारे लहान बालकांवर ख्रिस्तीकरणाचे संस्कार करण्यात येत, त्यामूळे शिक्षण हे धर्मप्रचाराचे प्रभावी माध्यम ठरेल याची मिशनरींना खात्री होती. या करीता त्यांनी मुंदलवाड येथे ' इ. स. 1905 मध्ये शाळा आणि चर्चची इमारत बांधली'[9] चर्चच्या इमारतीच्या बांधकामामुळे धर्मप्रचार सुलभ होण्यास मदत झाली. शिवाय महाराष्ट्रातील लोकमाणसावर धर्माचा प्रभाव असल्यामुळे मंदिरात जाणे, पुजाअर्चा करणे, भजन करणे, इ. माध्यमातून येथिल समाज परमेश्वराची भक्ती करीत होता. भिमराव थावरे हे आपल्या संशोधनात म्हणतात की, "मध्ययुगीन भक्ती चळवळीचा व भक्ती संतांचा महाराष्ट्रातील जनतेवर प्रभाव पडला होता. आणि मिशनरींनी हे अचुक ओळखले भजन आणि किर्तनाच्या माध्यमातून धर्मप्रचार केला जावू शकतो याची जाण मिशनरीना भक्ती चळवळीतून मिळाली"[10] यामूळे मिशनरींनी प्रेरणा घेवून आपल्या विचारांच्या प्रसारासाठी मध्ययुगीन प्रबोधनाची साधने वापरली. मिशनरींनी स्थापन केलेल्या चर्चमध्ये नियमित भक्ती होवू लागली. यशू ख्रिस्ताची भजने चर्चमध्ये गायली जावू लागली. चर्चच्या स्थापनेमुळे स्थायीपणे भक्ती घेण्यात येवू लागली परिणामी एतद्देशिय ख्रिश्चनांची अध्यात्मिक उन्नती होण्यास मदत होवून ते कायमस्वरुपी ख्रिश्चन बनले. शाळेच्या स्थापनेमूळे स्थानिक आदिवासींना शिंक्षण मिळू लागले या शिक्षणातून त्यांना आपल्या दैन्यावस्थेची जाणिव निर्माण झाली. या जाणिवेतून त्यांच्यामध्ये प्रबोधन घडून येण्यास मदत झाली. मुंदलवड आणि त्याच्या सभोवताली प्रचारकार्य करण्याची जबाबदारी "रेव्ह. डॉली, रेव्ह. ॲडरसन, रेव्ह. ए. जे. सेलिन, रेव्ह. सिमोन जॉन्सन, रेव्ह. लार्सन, रेव्ह. सिगर्ड ओलसन, श्रीमती मिलीन"[11] इ. मिशनरींनी केले. मुंदलवड हे खानदेशातील 'पहिले मिशन स्टेशन' म्हणून ओळखले जाते. मुंदलवड येथे मिशनरींना मिळालेल्या यशामूळे मिशनरींमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण झाला. या मिशनरींनी आणखी या भागात मिशन केंद्र स्थापन करण्याची योजना आखली. या भागात रस्त्यांची व्यवस्था नसल्यामुळे मिशनरींना पायी किंवा बैलगाडीने प्रवास करावा लागत असे. मिशनरींनी अनंत यातना आणि कष्ट सहन करुन नवी मिशन ठिकाणे शोधून काढली. ए. जे. सेलिन या मिशनरीने सातपुडा पर्वताच्या पायथ्यालगत पायी प्रवास करुन आणखी एक वसाहत स्थापन केली. ही वसाहत 'सेलिनपूर' या नावाने प्रसिद्धीस आली. सेलिनपूर येथे स्थाईक झालेल्या आदिवासींना त्यांनी बाप्तिष्मे दिले; आणि सामुहिक धर्मांतराची प्रक्रीया पार पाडली. सेलीन या मिशनरीने सेवाकार्याला सुरुवात केल्यानंत सेलिनपूरला चर्च स्थापन केले. नंतर सेलिनने आपला मोर्चा सेलिनपूर पासून 16 मैल अंतरावर असलेल्या 'तळोदा' येथे प्रचारकेंद्र उघडले. "इ. स. 1904 पासून तळोदा, काझीपूर भागात"[12] सेलिनने प्रचारकार्याची मोहीम उघडली. तळोदा ते सेलिनपूर लोकसेवा आणि प्रचारकार्य करुन सातपूडा भाग पिंजून काढला. सेलिनने या भागात ज्या काळात सेवाकार्य आणि प्रचारकार्याला सुरुवात केली त्यावेळी येथे शिक्षणाची सोय नव्हती. सेलिनने तळोदा, काझीपूर, सेलिनपूर येथे शाळा स्थापन करुन आदिवासींमध्ये शिक्षणप्रसाराचे महान कार्य केले. सेलिनच्या शिक्षणप्रसारामूळे स्थानिक आदिवासींना शिक्षण मिळाले. या शिक्षण घेतलेल्या आदिवासींना त्यामुळे लिहण्यावाचण्याची आवड निर्माण झाली. त्यातून युरोपीय प्रबोंधन आणि नवविचारांची ओळख होण्यास मदत झाली. 'इ. स. 1933 मध्ये अल्पशा आजाराने रेव्ह. ए. जे. सेलिन यांचा मृत्यू झाला'[13] त्यामूळे मिशनचे खुप नुकसान झाले. मात्र सेलिनसाहेबांनंतर त्यांचे अपूर्ण कार्य पूर्ण करण्याची जबाबदारी श्रीमती सेलिन यांनी पार पाडली. त्यांनी गावोगावी दौरे काढून लोकांना उपदेश केला. त्याच्याबरोबर इतरही मिशनरी प्रचारकार्य करीत होते. सततच्या त्रासमुळे आणि परिश्रमामुळे श्रीमती सेलिन वांरंवार आजारी पडू लागल्या आणि त्यांनी स्विडनला जावून आपले सर्व आयुष्य मिशनरी कार्यासाठी खर्च केले. श्रीमती सेलिन यांच्यानंतर मिशनरी कार्याची धुरा "श्रीमती आलमग्रीन, एल्बल्युम वाल्टर, थोरा फागरल्युंद, ग्रिनहिल्ड फिनस्ट्रोम, एलिझाबेथ फ्रॅकलिन, सिगर्ड ओलसन"[14] या मिशनरींनी प्रचारकार्य केले. मिशनरीनी

आजूबाजूची खेडी, बाजार, हिंदूची पवित्र स्थळे, अशा मोक्याच्या जागी मिशनरी पुन्हा –पुन्हा जात, घराघरातून मुद्दाम ओळखी करुन वैयक्तीक संपर्क करीत, स्थानिक लोकांमधून ख्रिस्ती बनलेल्या लोकांना या कामात सहभागी करुन घेण्यात येत असे. त्यामूळे मोठया प्रमाणात धर्मप्रचार होण्यास मदत झाली. असे असले तरी या आदिवासींना मदतीचा हात देवून तर कधी शैक्षणिक सुविधा देवून मिशनरींनी हे कार्य पार पाडले.

नंदूरबार शहरापासून ईशान्येस असलेल्या 'शहादा' या ठिकाणी डेन्मार्कच्या मिशनरी महिलांनी मिशनरी कार्य आणि सेवाकार्य केलेले दिसून येते. "श्रीमती लार्सन आणि श्रीमती जेनसन क्रिस्टीना यांनी शहादा येथे एक मिशन केंद्र सूरु केले"[15] व या भागात मिशनरी सेवेला प्रारंभ झाला. इ. स. 1915 मध्ये डेन्मार्कच्या मिशनरी महिलांचा एक गट शहादा येथे आला. या गटात सर्वच स्त्रीया असल्यामुळे या मिशनला 'डेन्मार्क मिशनरी गृप' असे म्हटले जाते. या मिशनरींनी शहादे भागात शाळा, अनाथालय, चालविले. या मिशनमधील काही स्त्रीया डॉक्टर व काही स्त्रीया नर्स होत्या. या मिशनरी स्त्रीयांनी खेडेगावात, पाडयांवर पायी भ्रमंती करुन आजारी रुग्णांवर उपचार केले. हे कार्य करीत असतांना कोणतीही आर्थिक अपेक्षा मिशनरींनी बाळगली नाही. या काळात जागतिक शांततेस धोका निर्माण झाला होता. संपुर्ण जग पहिल्या महायुध्दाच्या छायेत होत. त्यामुळे 'मिशनरींची कमतरता' या भागात निर्माण झाली. कारण महायुध्दामुळे मिशनरी परक्या देशात जावू शकले नाहीत. त्यामुळे जे मिशनरी भारतात होते त्यांच्यावर मिशनबोर्ड अवलंबून होते. परिणामी या काळात फारसे प्रचारकार्य झालेले दिसून येत नाही. असे असले तरी नंदूरबार भागात स्थापन झालेल्या स्विडीश मिशनने शहादा येथे आपले मिशनरी पाठवले. "मारीया म. मायर या मिशनरीने शहादे येथे येवून 1920 ते 1940 या काळात सेवाकार्य केले. शहादा बालगृहात इंगर वालु यांनी 1924 ते 1964 या काळात मिशनरी, शिक्षिका आणि माताश्री म्हणून सेवाकार्य केले".[16] मारीया मायर आणि इंगर वालु यांच्या सेवाकार्यामूळे अनेक अनाथ मुलांचे संगोपन झाले. आणि या मिशनरी महिलांच्या संवाकार्याने प्रभावित होवून त्यांनी ख्रिस्ती धर्म स्विकारला. शैक्षणिक संस्कार या आदिवासी मुलांवर झाल्याने त्यांच्यात विवेकवाद जागृत होवून त्यांची विचार करण्याची प्रवत्ती बळावली. त्यामुळे या आदिवासींनी शिक्षण घेवून स्वतःचा आर्थिक आणि सामाजिक विकास करण्याचा प्रयत्न केला. मारीया मायर आणि इंगर वालु आदिवासींना शिक्षण देत होत्या तर याच काळात धर्मांतरीत आदिवासींची अध्यात्मिक उन्नती करण्याचे कार्य "इ.स. 1916 ते 1951 या काळात दामोदर अंताजी पाटोळे यांनी केले."[17] श्री.पाटोळे हे चर्चचे उपदेशक होते. आणि स्थानिक भाषेतुन आदिवासींची अध्यात्मिक उन्नती करण्याकरीता मिशनरींनी स्थानिक उपदेशक नेमले होते. या उपदेशकांच्या कार्यामुळे नवख्रिस्तींचे कायमस्वरुपीचे ख्रिस्तीकरण झाले. चर्चमध्ये त्यांच्यावर ख्रिस्तीकरणाचे संस्कार करण्यात आल्याने आणि उपदेशकांच्या संदेशामुळे त्यांच्या अंर्तमनात ते रुजल्याने नंतरच्या काळात निर्माण झालेल्या 'हिंदुत्ववादी शुध्दी अंदोलनाचा' त्यांच्यावर प्रभाव पडला नाही. त्यामुळे एकदा धर्मांतरीत झालेले आदिवासी कायम ख्रिस्ती राहीले.

शहादा आणि नंदूरबारच्या उत्तरेकडील भागात सातपुडा पर्वताच्या रांगांमुळे घनदाट आरण्याचा हा प्रदेश होता. जंगली प्रदेश, अकृषीयोग्य जमिन, शिक्षणाचा अभाव, सांडपाण्याची दुरावस्था यामुळे डासांचा प्रादुर्भाव या भागात जास्त होता. त्यामुळे या भागात प्रशिक्षित डॉक्टरची आवश्यकता होती. शहादे भागात कार्य करण्यासाठी "श्रीमती ॲन्ना लॉरीडसन यांनी परिचारीका आणि मिशनरी म्हणून 1946 ते 1977 या काळात सेवाभावी कार्य केले."[18] त्यांच्या योगदानामूळे येथिल लोकांमध्ये आरोग्यविषयक जागृती घडून येण्यास मदत झाली. कारण या भागातील आदिवासींमध्ये भुते–खेते, चुरळीन, डाकीन, अंगात वारे येणे, भगत आणि भोपे या सारख्या अंधश्रध्दाळू विचारांचा प्रभाव होता. मिशनरींनी आरोग्यविषयक जनजागृती करतांना भगताविरुध्द मोहीम हाती घेतली. त्यामूळे या अंधश्रध्दांना थोडया प्रमाणात का होईना, आळा बसला.

नंदुरबार भागात 20 व्या शतकाच्या आरंभी चर्च मिशन सोसायटीने कार्य केल्याचे उल्लेख मिळतात. मात्र इ. स. 1906 नंतर 'डंकर ब्रदरन मिशनचे अद्यक्ष श्री. स्टोव्हर यांनी नंदुरबार मध्ये फ्रॅकलीनची भेट घेवून नंदुरबार येथे मिशनकार्य सुरु करण्याची विनंती केली.'[19] त्यांच्या विनंतीमूळे नंदुरबार, पाटोदा, शारोन, या भागात स्विडीश मिशनने रेव्ह. गुस्टाफसन यांच्या नेत्वृत्वात सेवाकार्याला सुरुवात केली. सेवाभावी मिशनरींनी अनाथालय, वस्तीगृह, शाळा सुरु करुन आदिवासींना आपल्याकडे आकृष्ट करण्याचा प्रयत्न केला. इ. स. 1907 मध्ये "वेसिमन नावाचे फिनीस मिशनरी या भागात आले. त्यांनी लोकांना ख्रिस्ताचे संदेश दिले. संदेश संपल्यानंतर ख्रिस्ताला स्विकारण्यास कोण तयार आहे असे अवाहन त्यांनी केले. त्यांच्या अवाहनाला मोठा प्रतिसाद लोकांनी दिला. त्यामूळे मिशनरींना खुप आनंद झाला. त्या दिवशी 80 लोकांना ढालग्रेन यांनी बाप्तिष्मा दिला"[20] या ठिकाणी झालेल्या प्रचारामुळे आपणास आदिवासींना धर्मांतरीत करता येईल अशी खात्री मिशनरींना झाली. मात्र तरीही मिशनरींना फारसे यश आलेले दिसत नाही. कारण मिशनकार्यासाठी पैशाची आवश्यकता मोठया प्रमाणात होती. मिशनरींचे भारतातील मिशनकार्य हे परकिय मदतीवर अवलंबुन होते.

नंदुरबारमध्ये मिशनकार्य जोर धरु लागले होते. 'उत्तर अमेरीकेतील स्कॅडनेव्हियन अलायन्स मिशनतर्फे श्री. ओ. ए. ढालग्रीन हे नंदुरबार भागात सेवाकार्यासाठी आले'[21] ढालग्रीन या मिशनरीने नंदुरबार पासून पश्चिमेस 10 मैल अंतरावर असलेल्या धानोरा येथे एक ख्रिश्चन वसाहत स्थापन करुन प्रचारकार्याला प्रारंभ केला. धानोरा येथे या काळात सर्वच शेतकरी कुळे होती. या कुळाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी मिशनरींनी प्रयत्न केले. श्री.ढालग्रीन यांनी या कुळांना "सरकारने मदत करावी म्हणून त्यांनी ब्रिटीश सरकारकडे एक अर्ज केला. सरकारने त्या अर्जाचा विचार करुन 500 एकर जमिन उपलब्ध करुन दिली."[22] असे असले तरी परकिय मदत आणि सरकारी यंत्रणा यांच्या मदतीने कुळांच्या स्थितीत सुधारणा झाल्या नाहीत. धानोरा येथिल कार्य स्विडीश मिशनकडे सोपवून ढालगीन दाम्पत्याने आपला मोर्चा

नवापूरकडे वळवीला.

इ.स. 1907 मध्ये स्विडीश मिशनरी हेनोक हेटबर्ग धानोऱ्यात आले. त्यांनी सेवाकार्याला सुरुवात करण्यापूर्वी स्थानिक आदिवासींची भाषा आत्मसात केली. धानोरा येथे असणाऱ्या लोकांची अध्यात्मिक प्रगती करण्यासाठी त्यांनी "इ. स. 1918 मध्ये चर्चची इमारत बांधली"[23] आणि सेवाकार्य आणि प्रचारकार्य केले. श्री. हेटबर्ग हे आदिवासी भाषेतून संपर्क करीत त्यामूळे अनेक आदिवासी मिशनरींच्या सानिध्यात आले. श्री. हेटबर्ग यांनी इ.स. 1917 मध्ये धानोऱ्यास शाळा आणि वस्तीगृह सुरु करुन आदिवासींना शिक्षण दिले. त्यामुळे आदिवासींमध्ये स्वत्वाच्या जाणिवा निर्माण होण्यास सुरुवात झाली. मिशनरींनी धानोरा भागात जे सेवाभावी कार्य केले. त्या कार्यामागे धर्मप्रसार हा प्रमुख उद्देश होता.

निष्कर्षः–

नंदुरबार जिल्ह्यात कार्य करीत असलेल्या मिशनरींनी धर्मप्रचार करतांना समाजसेवेचे कार्य हाती घेतले. मिशनरींनी दिन–दलित, गरजू आदिवासीकरीता काढलेल्या शाळांमुळे आदिवासी ख्रिस्ती मिशनरींकडे आर्कर्षीत होण्यास मदत झाली. मिशनरीं शाळांमधून इंग्रजी, गणित ज्योतिषशास्त्र, इतिहास, भुगोल विज्ञान अशा आधुनिक शास्त्रांचे जुजबी शिक्षण दिले जात असे. मिशनरी शाळांमधुन मिळणाऱ्या शिक्षणामूळे आणि मिशनरींकडून मिळणाऱ्या आपुलकीच्या वागणुकीमूळे आदिवासींच्या अंर्तमनात मिशनरींविषयी आदरभाव निर्माण होणे सहाजिकच होते. मिशनरी शाळांमधून मिळणारे शिक्षण हे भारतीयांना खिश्चन धर्माकडे आकर्षीत करण्याचे साधन होत. असे विचार या काळात मांडण्यात आले. मात्र मिशनरीं शिक्षणामुळे समाजतील खालच्या घटकाला शिक्षण मिळाले. त्यामुळे एकाच दिशेने शिक्षणक्षेत्रात मक्तदारी निर्माण करु इच्छिणाऱ्या अभिजन वर्गात वहाणारा शिक्षणाचा ओघ अनेक दिशांकडे प्रवाहीत झाला. मिशनरींनी शिक्षणाचे दरवाजे समाजातील सर्वच थरांतील लोकांकरीता खुले केल्यामुले मौखिक परंपरेचे महत्व जावून आता लिहण्याचावण्याला महत्व आले. त्यामुळे विचार व्यक्त करण्याची नवी दृष्टी समाजाला मिळाली. मिशनरी शिक्षणापासून व शिक्षणसंस्थांपासून समाजसुधारकांना प्रेरणा मिळाली. आधुनिक काळात जीवनमान उंचावयाचे असेल तर, नवी शिक्षणपध्दती अपरिहार्य असल्याचे समाजधुरीणांच्या लक्षात आले. त्यामुळे महाराष्ट्रात अनेक शिक्षणसंस्था उभ्या राहू लागल्या.

मिशन शाळांमध्ये शिक्षण घेतलेला आदिवासी त्याच शाळेत शिक्षकाची नोकरी करु लागला. याचाच थोडक्यात अर्थ असा की, मिशनरींना नवा एतद्देषिय धर्मप्रचारक वर्ग निर्माण करता आला. मिशन शाळांमध्ये शिक्षण घेतलेल्या या वर्गाने मिशनरींचे अनुकरण करण्यास सुरुवात केली. मिशनरी शिक्षण पध्दतीचा प्रभाव शिक्षण घेतलेल्या बुध्दावादी वर्गावर पडाला.या वर्गाने टाय, जोडे, कपडे या बाबतीत मिशनरींचे अनुकरण करण्यास सुरुवात केली. परिणामी हा वर्ग इंग्लड आणि युरोपात तयार होणाऱ्या वस्तुंचा उपभोक्ता बनला. त्यामुळे भारताच्या संपत्ती शाषणाच्या ब्रिटीशांच्या धोरणाला चालना मिळाली. त्याचा परिणाम भारतातील वस्त्रोद्योगांवर झाला. बाजारपेठेत भारतीय मालाला उठाव न राहील्यामूळे हे उद्योग बंद पडले.

नंदूरबार जिल्हयात मिशनरींच्या कार्यामूळे अंधश्रध्दा कमी होण्यास बरीच मदत झाली. कोणताही आजार आला तरी मरीआईचा कोप झाला अशी या भिल्ल आदिवासींची समजूत होती. त्यामूळे देवाला नवस बोलणे, धागेदोरे मंतरणे, या अंधःश्रध्दाळू प्रथांविरुध्द मिशनरींनी जागृती केली. परिणामी भगतांचे महत्व कमी होवून मिशनच्या दवाखान्यात औषधोपचार घेणाऱ्या लोकांची संख्या वाढली. आणि आजारी लोकांची सेवा करतांना मिशनरींच्या सेवाकार्याने प्रभावित होवून अनेक धर्मांतरे घडून आली.

नंदूरबार जिल्हयात मिशनरींनी ज्या स्त्रीयांमध्ये प्रचारकार्य केले त्या स्त्रीयांचा पोशाख आणि रहाणीमानात बदल झाला. डोक्यावरील फडकीची जागा गाउन, आणि ओढणीने घेतली. त्यामुळे आदिवासींमधील फरक समजणे कठीण होवून बसले. यापुर्वी सांस्कृतीकदृष्टया आपले वेगळेपण दाखविणारा आदिवासी समाज पाश्चात्य संस्कृतीत विलीन झाला. हा ख्रिस्ती धर्मांतराचा आणि मिशनरींचा फार मोठा सांस्कृतीक प्रभाव म्हटला पाहीजे.

संदर्भसुची :–

1) शहा मु. ब.(संपा.), 'खानदेशचा सांस्कृतिक इतिहास', भाग 1, का. स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था धुळे, पृ. 141.
2) Naik J. P. Nurullah, 'History of Education in India', Bombay, 4Th Oct 1950, P.164.
3) Dhalgren Olaf Anton, 'Our Bheel Mission In India', Scandinavian Allannce Missin oF North America, Chicago, 1909, P.20
4) Ibid, P. 20.
5) Report, American Marathi Mission, 1897, Caxton Printing Press, Bombay, 1998, P.18.
6) Dhalgreen O. A. Op Cit, P. 20.
7) Ibid, P. 20.
8) सुर्यवंशी स. ना., 'सुवार्तिकांच्या पाऊलखुणा', द इव्हॅन्जेलिकल अलायन्स मिनिस्ट्रीज, नाशिक, पहिली आवृती, 1999, पृ. 425.
9) कोनशिला, सदर 'कोनशिला' मुंदलवड चर्च आणि शाळेच्या इमारतीवर लावण्यात आली आहे.

10) Thavre Bhimrao 'A Study in Hindu Bhakti Movement in Maharashtra', With the special Refrance in Varkari & Kavedi Tredition s and their Missiological Theological Impalication , Unpublished Thisis, Master of Thiologi, Senate of Serampore College, Unian Biblical Seminary , Bibvevadi, pune.P. 168.
11)कॅलेंडर, 'शतक महोत्सव वर्ष' सुर्वाता अलायन्स मिनिस्ट्रीज ट्रस्ट, नंदूरबार.
12)जांबीलसा बी. एन., 'मंदलवड ख्रिस्ती मंडळीचा षताब्दि अहवाल',;अप्रकाशित, मुंदलवड, ता. आक्राणी,दि. 05 / 05 / 2000, पृ. 1.
13) Selin A. J. 'His Tomb Matter', Taloda Mission Compound, Taloda.
14)वळवी मुक्तामाला ल्युथर, 'मुलाखत' , धर्मांतरीत ख्रिश्चन, दि.07 / 09 / 2007, वेळ 17:23,तळोदा जि. नंदुरबार.
15) स्मरणिका, 'सुर्वाता अलायन्स चर्च', शहादा, अमृत महोत्सव, 1933 ते 2008, पृ 10.
16) कोनशिला, सदर 'कोनशिला' शहादे चर्चच्या आतील बाजूस लावण्यात आली आहे.
17) कोनशिला, सदर 'कोनशिला' शहादे चर्चच्या आतील बाजूस लावण्यात आली आहे.
18) कोनशिला, सदर 'कोनशिला' शहादे चर्चच्या आतील बाजूस लावण्यात आली आहे.
19)सुर्यवंशी स. ना., पुर्वोक्त पृ. 427.
20)सुर्यवंशी स. ना., उपरोक्त पृ. 428.
21) Dhalgreen O. A., 'Loc Cit', 29.
22)सुर्यवंशी स. ना., पुर्वोक्त, पृ. 429.
23)कोनशिला, सदर 'कोनशिला' धानोरा चर्चच्या इमारतीवर लावण्यात आली आहे.